# नवी मुंबई महानगरपालिका

**महानगरपालिका सचिव कार्यालय, ८ वा मजला, बेलापूर भवन सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**-: सर्वसाधारण सभेची नोटीस :-** **दिनांक ३०/१२/२०१३.**

नवी मुंबई महानगरपालिकेची **जानेवारी महिन्याची सर्वसाधारण सभा, मंगळवार, दिनांक ०७ जानेवारी २०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता** नवी मुंबई महानगरपालिका, बेलापूर भवन, सी.बी.डी., बेलापूर येथील ७ व्या मजल्यावरील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

१. इतिवृत्त कायम करणे.

२. प्रश्नोत्तरे.

**आयुक्तांकडील प्रस्ताव :**

३. नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील "कामगार अधिकारी" या पदनांमाऐवजी "कामगार कल्याण अधिकारी" या पदनामाने संबोधणेबाबत.

४. वाशी सेक्टर २६ नवी मुंबई येथे ॲम्युजमेंट पार्क बांधणे.

५. बेलापूर विभागातील करावे गांव येथे उर्वरित मलनि:स्सारण वाहिनी टाकणे.

६. प्र.क्र. ८७ नेरुळ सेक्टर-४६ए, भु.क्र.६, येथील मैदान विकसित करणे.

७. कोपरखैरणे प्र.क्र.३१, से.४ येथील सम्राट स्वीटस ते प्लॉट नं. ६४ व से.५ येथील वरदविनायक सोसायटी ते मयुर अपार्टमेंट पर्यंत हेव्ही डयुटी गटार बांधून रस्ता रुंद करणे.

८. कोपरखैरणे से.१२ मधील रस्त्यांची डांबरीकरणाने सुधारणा करणे.

९. बेलापूर विभागातील किल्ले गावठाण ते डी.पी.एस.शाळा से.५२, ५८ नेरुळ येथील सर्व्हिस रस्त्याची दुरुस्ती व सुधारणा करणे.

१०. मोरबे धरण प्रकल्पाचे देखभाल व दुरुस्तीचे त्रैवार्षिक सर्वसमावेशक कंत्राट.

११. मोरबे धरण प्रकल्प येथील मोरबे वसाहतीच्या क्षेत्रास दगडी संरक्षक भिंत बांधणे.

१२. मोरबे धरण प्रकल्प येथील पुनर्वसित वडविहीर कोयना नं.- १ व २ तसेच बोरगांव(खु) या गांवाच्या बाजूस दगडी संरक्षक भिंत बांधणे.

**ठरावाच्या सूचना :**

**१३. श्री. अमित रमेश पाटील, यांजकडून :-**

प्र. क्र. ८६, येथील आयकर कॉलनी ते बेलापूरगांव यांना जोडणा-या मार्गावर पादचारी पूल बांधणे.

**१४ ते १६. सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-**

(१४) प्र. क्र. २१, मध्ये तळवली नाका येथे नव्याने विकसित होणा-या सेक्टर २१ येथे जळकुंभासाठी सिडकोकडून भुखंडाची मागणी करणे. प्र. क्र. २१, तळवली नाका येथे लोकांची संख्या भरमसाठ वाढत असून तळवली नाका येथे असणा-या जळकुंभाची क्षमता सहा लाख लिटर एवढी आहे. पण ती वाढणा-या लोकखंख्येनुसार पुरेशी नाही. त्यामुळे माझ्या प्रभागात नेहमी पाण्याची टंचाई असते त्यामुळे फार गैरसोय होते. (१५) प्र. क्र. २१, तळवली नाका ते तळवलीगांव येथील नामदेव पाटील चाळ, कुंडलीकवाडी, शांतीनगर, गावदेवीवाडी येथे अंतर्गत पदपथ व गटाराची दुरुस्ती करुन सुधारणा करणे. (१६) प्र. क्र. २१, अंतर्गत नोसिल नाका येथील १९९५ पुर्वीचा झोपडयांचा सर्व्हे २००१ मध्ये झाला होता. त्यातील काही झोपडया अपात्र आहेत व या अपात्र झोपडयांचा व राहीलेल्या १९९५ पुर्वीच्या झोपडयांचा सर्व्हे पुन्हा करणे.

**१७ ते १९. श्री. बहादुर त्रिलोक सिंह बिष्ट, यांजकडून :-**

(१७) ठाणे महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृत नळ संयोजन पाणी देयक योजना कार्यान्वित आहे. मा. आयुक्त व मा. कार्यकारी अभियंता, पाणी विभाग, नवी मुंबई महानगरपालिका यांनी ठाणे महानगरपालिका कडून माहिती घेऊन अनधिकृत नळ संयोजन पाणी देयक योजना नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात लागु करुन कार्यान्वित करावी.

(१८) प्र. क्र.५ इलठण, सुभाषनगर येथे शिवशंकर चाळ, सरस्वती चाळ, आठरुम चाळ, शुक्ला चाळ, आदर्श चाळ येथील गटारे व पदपथ आर. सी. सी. पद्धतीने बनवुन पेवर ब्लॉक लावून मिळावे. (१९) प्र. क्र. ५, इलठण, सुभाषनगर येथिल हनुमान मंदिर परिसर, शंकर मंदिर, नायडु चाळ, दुर्गामाता मंदिर परिसरातील गटारे व पदपथ आर. सी. सी. पद्धतीने बनवुन पेवर ब्लॉक लावून मिळावे.

**२० ते २२. श्री. संजय बाळाजी पाटील, यांजकडून :-**

(२०) प्र. क्र. २५, घणसोली, समर्थनगर जवळील पाण्याच्या टाकीजवळ मोकळया असलेल्या भुखंडावर घणसोलीसाठी उद्यान विकसीत करणे. (२१) प्र. क्र. २५, घणसोली, से.६ प्रोग्रेसीव सोसायटी समोरील उद्यानाची दुरावस्था झाली आहे. सदर उद्यानाची दुरुस्ती करुन त्यात नागरीकांना बसण्यासाठी बाकडे व लहान मुलांसाठी खेळणी लावणे. (२२) प्र. क्र. २५, घणसोली मधील विद्युत दिव्याची अत्यंत दुरावस्था झालेली असून काही दिवे कायम बंद अवस्थेत आहेत. सदर ठिकाणी नवीन दिवे लावून, फिटींग बदलून काही ठिकाणी खराब झालेले जुने पोल बदलून त्याठिकाणी नवीन पोल लवकरात लवकर लावणे.

**२३ ते २५. श्री. सुरेश शंकर भिलारे, यांजकडून :-**

(२३) नवी मुंबई मुख्यकरुन ऐरोली नगरात झपाटयाने लोकवस्ती वाढत आहे. त्याबरोबर दोन चाकी व चार चाकी वाहनांची प्रचंड वर्दळ वाढली आहे. त्याकरिता ऐरोली नगरात अधिकृत पार्किंगस्थळ निर्माण करुन रहिवाशांना दिलासा दयावा. (२४) नवी मुंबई महानगरपालिकेच्या नुतन मुख्य कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी सर्व कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर सन्मा. नगरसेवक व नगरसेविका व इतर सन्मा. अतिथी बरोबर कायमस्वरुपी नांवे लावणे. (२५) प्र. क्र. १६ येथील मजउद्दीन हायस्कुल सेक्टर ८ येथे हजारो विद्यार्थी ऐरोली नगरातील शिकत आहे. सदर हायस्कुलच्या मैदानाच्या बाजुला प्रचंड मोठा नाला असुन त्या नाल्याला R.C.C. संरक्षणभिंत बांधावी त्यामुळे विद्यार्थ्यांची सुरक्षितता कायमस्वरुपी निर्माण होईल.

**२६ ते २८. श्री. भोलानाथ महादू ठाकूर, यांजकडून :-**

(२६) प्र. क्र. १, ईश्वरनगर विभागातील सर्व जुने गटार काढुन तेथे नवीन गटार, पदपथ व गटारावरील झाकण बांधण्याची तरतूद करणे. (२७) प्र. क्र. १, सद्‌गुरुनगर विभागातील सर्व जुने गटार काढुन तेथे नवीन गटार, पदपथ व गटारावरील झाकण बांधण्याची तरतूद करणे. (२८) प्र. क्र. १, बालीनगर सर्व जुने गटार काढुन तेथे नवीन गटार, पदपथ व गटारावरील झाकण बांधण्याची तरतूद करणे.

**२९ ते ३१. श्री. काशिनाथ जनार्दन पाटील, यांजकडून :-**

(२९) प्र. क्र. ६५, सानपाडा, सेक्टर १० येथील डी.व्ही. पाटील (मास्तर) मैदानात मातीचा भराव टाकून मैदान समपातळी करणे. (भुखंड क्र.४१) (३०) प्र. क्र. ६५, जुईनगर, सेक्टर २३ येथील रस्त्यांच्या कडेला असलेल्या मुख्य नाल्याला संरक्षणभिंत बांधणे. (३१) प्र. क्र. ६५, जुईनगर येथील रेल्वे क्रॉसिंगवर उड्डाणपूल बांधणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर )**
**महानगरपालिका सचिव (प्र.),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक ३० डिसेंबर २०१३.**